# बिपीन कोल्हे यांना शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनचा जीवनगौरव पुरस्कार प्रदान




**कोपरगाव (प्रतिनिधी)–** साखर उद्योगातील उल्लेखनीय कार्य, नाविन्यपूर्ण उपक्रम व तांत्रिक उत्कर्षासाठी संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीन कोल्हे यांना शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन, नवी दिल्ली यांच्यावतीने देशपातळीवरील सर्वोच्च जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते उद्घाटन होऊन २५ जुलै रोजी नवी दिल्ली येथे पार पडलेल्या एका भव्य समारंभात या पुरस्काराचे वितरण झाले. प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राष्ट्रीय सहकारी साखर महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील व दि शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशनचे अध्यक्ष संजय अवस्थी यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. शंभर वर्षांहून अधिक काळापासून साखर उद्योगातील तांत्रिक व शाश्वत प्रगतीसाठी कार्यरत असलेली शुगर टेक्नॉलॉजी असोसिएशन ही देशातील अग्रगण्य संस्था असून प्रत्येक वर्षी साखर क्षेत्रात विशिष्ट योगदान दिलेल्या व्यक्तींचा गौरव करते. यंदाच्या २०२५ सालच्या पुरस्कारासाठी बिपीन कोल्हे यांची निवड करण्यात आली होती.

बिपीन कोल्हे यांनी शंकरराव कोल्हे कारखान्याच्या माध्यमातून ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध तांत्रिक व आर्थिक उपक्रम यशस्वीपणे राबवले. माजी मंत्री स्व. शंकरराव कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी देशविदेशातील साखर तंत्रज्ञानाचा अभ्यास करून कारखानदारीत आधुनिकीकरण केले. इथेनॉल उत्पादन क्षेत्रात कोल्हे कारखान्याने देशात सर्वप्रथम आघाडी घेतली, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांच्या बांधावर नव्या सुविधा पोहोचवल्या. यावेळी जयंत पाटील, रणजीत पुरी, एन. चिन्नप्पन, संभाजीराव कडू, डॉ. सीमा परोहा, कोल्हे कारखाना अध्यक्ष व इफको दिल्लीचे संचालक विवेक कोल्हे आदीसह मान्यवर उपस्थित होते.

# राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करण्याचे निर्देश

**मुंबई (प्रतिनिधी)–** विद्यार्थ्यांचे शिक्षण आणि सुरक्षितता या बाबी महत्त्वाच्या असल्याने राज्यातील धोकादायक शाळा इमारतींचे सर्वेक्षण करून शाळांमध्ये आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्देश शालेय शिक्षण राज्यमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी शुक्रवारी दिले.

विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेच्या अनुषंगाने राज्यातील शाळा इमारत सुरक्षितेसाठी डॉ. भोयर यांनी आज तातडीने बैठक घेतली. राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिक क्षेत्रातील शाळा इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिटही करावे. याबाबतचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करावा, अशा सूचना डॉ. भोयर यांनी दिल्या.

जिल्हा परिषद, नगरपालिका आणि महानगरपालिका क्षेत्रातील मोडकळीस आलेल्या शाळा इमारतींची तपासणी करून त्यांची बांधकामे नव्याने करण्यासाठी सर्वेक्षण करून सर्व समावेशक आराखडा तयार करावा. तसेच धोकादायक शाळा इमारतींच्या बांधकामासाठी प्राधान्यक्रम ठरवून जिल्हा नियोजन समितीमधून आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल, असेही डॉ. भोयर यांनी सांगितले.

मंत्रालयात झालेल्या या बैठकीला विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल, उपसचिव समीर सावंत आदी उपस्थित होते. तर दूरदृश्य प्रणालीद्वारे शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, समग्रचे प्रकल्प संचालक संजय यादव, प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि राज्यातील जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सर्व शिक्षणाधिकारी सहभागी झाले होते.

# २३ हजार शेतकऱ्यांना १९ कोटींची नुकसान भरपाई

## एप्रिल व मे महिन्यात अवकाळी पावसाची झळ

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – यंदा एप्रिल व मे महिन्यात जिल्ह्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणावर शेतीचे आणि फळबागांचे नुकसान झाले होते. या आपत्तीग्रस्त परिस्थितीत तब्बल २३ हजार ४४५ शेतकऱ्यांना १८ कोटी ९३ लाख सहा हजार रूपयांची नुकसान भरपाई देण्याचा शासन निर्णय घेतला आहे. भरपाईची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाणार आहे.

जिल्ह्यातील १० हजार ६४८ हेक्टर क्षेत्र या अवकाळी पावसाच्या तडाख्याने बाधित झाले. विशेषतः दक्षिण जिल्ह्यातील जामखेड, कर्जत, श्रीगोंदा, पारनेर, नगर आणि पाथर्डी या तालुक्यांमध्ये पावसाचा जोर अधिक होता. फळबागांसह उन्हाळी पिकांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. एप्रिल व मे महिन्यांत झालेल्या पावसामुळे आंबा, डाळिंब, मोसंबी, चिकू, द्राक्षे, पपई यांसारख्या फळबागा उध्दवस्त झाल्या. त्यासोबतच मका, कांदा, भुईमूग, उन्हाळी बाजरी यांसारख्या पिकांचेही नुकसान झाले आहे. या नुकसान भरपाईसाठी आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ च्या कलम ४८(२) नुसार स्थापन करण्यात आलेल्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधी मधून ही रक्कम मंजूर करण्यात आली आहे. या निधीमध्ये केंद्र शासनाचा ७५ टक्के व राज्य शासनाचा २५ टक्के हिस्सा असतो. दरम्यान, नुकसान झालेल्या भागात कृषी व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून संयुक्त पंचनामे केले होते. वेळेवर पंचनामे पूर्ण होण्यासाठी जिल्हा प्रशासनाने अतिरिक्त कर्मचारी आणि अधिकाऱ्यांची तात्पुरती नियुक्ती केली होती. या पंचनाम्यांवर आधारित प्रस्ताव शासनाकडे पाठवले गेले, आणि त्यावर तत्काळ निर्णय घेऊन भरपाई मंजूर करण्यात आली.

एप्रिल महिन्यात ४ हजार १२७ हेक्टर क्षेत्राचे नुकसान होऊन ७ हजार २६८ शेतकरी बाधित झाले होते. त्यापोटी एकुण ७ कोटी १८ लाख ८६ हजार रूपये भरपाई मंजूर झाली आहे. तसेच मे महिन्यात ६ हजार ५२१ हेक्टर क्षेत्राचे नुकसान होऊन १६ हजार १७७ शेतकरी बाधित झाले होते. त्यापोटी ११ कोटी ७४ लाख २० हजार रूपये भरपाई मंजूर झाली आहे.

**निधी हस्तांतरास बंदी**

भरपाईची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या वैयक्तिक बँक खात्यात जमा केली जाणार आहे. कर्ज खात्यात किंवा अन्य खात्यांमध्ये निधी वळवू नये, असा स्पष्ट आदेश प्रशासनाकडून बँकांना देण्यात आला आहे. निधी वितरित झाल्यानंतर शेतकऱ्यांची यादी अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द केली जाणार आहे.

# बसमध्ये सीसीटीव्ही अनिवार्य करण्याचे एसपींचे निर्देश

## शालेय वाहतूक अधिक सुरक्षिततेच्या दिशेने पाऊल

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – शालेय विद्यार्थ्यांची ने-आण करणाऱ्या बस व वाहनांची सुरक्षा अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने प्रत्येक शालेय वाहनामध्ये सीसीटीव्ही कार्यान्वित करण्याचे स्पष्ट निर्देश जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात नुकतीच पार पडलेल्या जिल्हा शालेय बस सुरक्षितता समितीच्या बैठकीत हे निर्देश देण्यात आले. या बैठकीस महानगरपालिकेचे उपायुक्त विजय मुंडे, प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सगरे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी, पोलीस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, चंद्रकांत खेमनर आदी उपस्थित होते. घार्गे यांनी बैठकीत बोलताना सांगितले की, विद्यार्थ्यांची ने-आण करताना कुठलीही तडजोड होऊ नये. वाहनांमध्ये सीसीटीव्ही कार्यरत असणे केवळ गरजेचेच नाही, तर अनिवार्य आहे. तसेच सहा वर्षांखालील विद्यार्थ्यांसाठी महिला कर्मचारीची नियुक्ती देखील करण्यात यावी. बस किंवा वाहनांवर शाळेचा नाव, संपर्क क्रमांक व तातडीच्या दूरध्वनी क्रमांक स्पष्टपणे लिहिलेले असावेत, अशीही सूचना देण्यात आली. यामुळे कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी तात्काळ संपर्क साधता येऊ शकेल.

शाळेच्या परिसरातच विद्यार्थ्यांची चढ-उतार व्हावी यासाठी प्रत्येक शाळेने आपल्या बस पार्किंगची व्यवस्था योग्य रीतीने करावी, असे निर्देशही यावेळी देण्यात आले. रस्त्यांवर थांबून चढ-उतार केल्यास अपघात होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे सर्व वाहनचालकांनी शिस्तपालन करणे अत्यावश्यक आहे. प्रत्येक शाळेने एक जबाबदार समन्वय अधिकारी नियुक्त करावा, जो वाहनांच्या सुरक्षेवर सतत लक्ष ठेवेल. तसेच सर्व शाळांनी नियमितपणे शालेय परिवहन समितीच्या बैठकांचे आयोजन करावे, असे आवाहन करण्यात आले.

**अवैध वाहतूक रोखण्यासाठी संयुक्त मोहीम**

अवैध शालेय वाहतुकीच्या वाढत्या प्रकारांकडे लक्ष वेधत, घार्गे यांनी संबंधित यंत्रणांना संयुक्त तपासणी मोहीम राबविण्याच्या सूचना दिल्या. परवाना नसलेली किंवा अधिक क्षमतेपेक्षा भरलेली वाहने, सुरक्षेची अयोग्य साधने याविरोधात तत्काळ कारवाई करण्यात यावी, असा आदेश देण्यात आला.

# शनैश्वर देवस्थान विश्वस्तांना १ ऑगस्ट तारीख

**सोनई (वार्ताहर)–** शनिशिंगणापूर येथील शनैश्वर देवस्थानच्या नोकर भरती प्रकरणी मुंबई धर्मादाय आयुक्त कार्यालयात दि. २५ रोजी सुनावणी झाली. त्यात १ ऑगस्ट ही पुढील तारीख देण्यात आली असल्याची माहिती मिळाली आहे.

नेवासाचे आमदार विठ्ठलराव लंघे व आ. सुरेश धस यांनी विधानभवनात लक्षवेधी सूचनेत शिंगणापूर येथील ॲप घोटाळा व नोकर भरतीतील भ्रष्टाचार मांडला. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर देताना घोटाळ्याची माहीती दिली व लवकर विश्वस्त मंडळावर कारवाई करून विश्वस्त बरखास्त करण्यात येणार असल्याचे सांगितले. दुसऱ्याच दिवशी अहिल्यानगर सायबर शाखेने शिंगणापूर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली व मुंबई येथील धर्मदाय कार्यालयाने सर्व विश्वस्तांना नोटीस बजावून दि. १८ रोजी म्हणणे मांडण्यासाठी सांगितले होते. विश्वस्तांच्या वतीने मुंबई येथील ॲड. समीर जाधव यांनी बाजू मांडण्यासाठी निवडण्यात आले.

दि. १८ ला सुनावणी झाली व त्यात दि. २५ जुलै तारीख देण्यात आली होती. दि. २५ ला सुनावणी झाली व त्यात १ ऑगस्ट रोजी म्हणणे मांडण्यासाठी सांगितले आहे.

# वादग्रस्त मंत्र्यांवर गंडांतर येण्याची चिन्हे

**मुंबई (प्रतिनिधी)–**जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील कुसुमाग्रज मराठी अध्यासन केंद्र आणि छत्रपती शिवा जी महाराज मराठी अध्यासन केंद्राच्या उदघाटनाच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी नवी दिल्लीत भाजपच्या शीर्षस्थ नेत्यांची भेट घेतल्याने सत्ताधारी महायुतीतील वातावरण तापले आहे. फडणवीस यांच्यासोबतच्या भेटीत केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी आरोप आणि चित्रफितीमुळे वादग्रस्त ठरलेल्या मंत्र्यांची माहिती घेतल्याचे समजते. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून वादाच्या भोवऱ्यात सापडलेल्या मंत्र्यांवर गंडांतर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. मात्र, या मंत्र्यांवर नेमकी कोणती कारवाई होणार आणि तिचे स्वरूप काय असेल, याविषयी अद्याप स्पष्टता आलेली नाही.

नुकत्याच पार पडलेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात महायुतीतील उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या गटातील मंत्र्यांवर आरोपांच्या फैरी झडल्या. ऐन अधिवेशनात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांची चित्रफीत प्रसारित झाली. शिरसाट यांच्या घरातील या चित्रफितीत दिसत असणाऱ्या बॅगा नोटांनी भरलेल्या असल्याचा दावा केला जात आहे. शिंदे गटाचे गृह खात्याचे राज्यमंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावाने मुंबईत बार असल्याचा आरोप विधान परिषदेत करण्यात आला. तर अधिवेशनाचे सूप वाजताच कृषिमंत्री माणिकराव ठाकरे यांची सभागृहात बसून मोबाईलवर रमी खेळत असल्याची चित्रफीत समोर आली. या साऱ्या घटनाक्रमामुळे फडणवीस सरकारच्या प्रतिमेला धक्का बसला आहे. या पार्श्वभूमीवर फडणवीस यांच्या दिल्लीतील भेटीगाठीवेळी भाजपच्या नेत्यांनी विशेषतः अमित शहा यांनी महायुतीच्या मंत्र्यांवर झालेल्या आरोपांची आणि हिंदी-मराठी वादाची माहिती घेतल्याचे सांगण्यात येते. फडणवीस यांनी आज संसद भवनात शहा यांची सदिच्छा भेट घेतली. सुमारे २५ मिनिटे ही बैठक चालली. या भेटीत शहा यांनी महाराष्ट्रातील सद्य राजकीय परिस्थितीची माहिती घेताना महायुतीतील मंत्र्यावर झालेल्या आरोपांची शहानिशा केल्याचे समजते. माणिकराव कोकाटे यांच्याबाबत पुढील आठवड्यात चित्र स्पष्ट होईल. येत्या सोमवारी किंवा मंगळवारी कोकाटे हे अजित पवार यांना भेटून आपली बाजू मांडणार आहेत. त्यानंतर अजित पवार मुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेणार आहेत. त्यावेळी फडणवीस हे भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाची नाराजी अजित पवार यांच्या कानावर टाकण्याची शक्यता आहे.

दरम्यान, आपल्या दिल्ली भेटीला फडणवीस यांनी राजनाथसिंग, जे. पी. नड्डा, मनोहरलाल खट्टर, निर्मला सीतारामन, शिवराजसिंग चौहान तसेच नीती आयोगाची भेट घेऊन राज्यातील विविध विकास प्रकल्पांबाबत चर्चा केली.

# शनिवारच्या शाळेची वेळ पूर्ववत

## सकाळी ७.३० ते ११ यावेळेत भरणार जिल्हा परिषदेच्या शाळा

**अहिल्यानगर (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील सर्व जिल्हा परिषद प्राथमिक शाळांची शनिवारची वेळ पूर्वीप्रमाणेच सकाळी ७.३० ते ११ अशी करण्याचा निर्णय जिल्हा परिषद प्रशासनाने घेतला आहे, शिक्षण विभागाकडून ही माहिती देण्यात आली. अलिकडेच ही वेळी सकाळी ९ ते दुपारी १.३० अशी करण्यात आली होती.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा पूर्वी शनिवारी ७:३० ते ११ वाजताच्या दरम्यान भरत होत्या. मात्र, मध्यंतरी या वेळेत बदल करण्यात आला होता. सकाळी ९ ते दुपारी १:३० अशी वेळ करण्यात आली होती. मात्र, शाळांची वेळ पूर्वीप्रमाणचे करावी कारण जिल्हा परिषदेच्या शाळा या खेड्यांमध्ये असल्यामुळे बहुतांशी शेतकरी वर्गातील वाड्या-वस्त्यांवरील पालक हे दुपारी शेतीमध्ये कामासाठी जातात. त्यावेळी मुलांना शाळेमध्ये ने-आण करणे अवघड जाते. त्यामुळे पालकांसह शिक्षक संघटनांनी शाळेची वेळ पूर्वीप्रमाणेच करावी अशी मागणी केली होती. दरम्यान, यासंदर्भात खासदार नीलेश लंके यांनी देखील जिल्हा परिषद प्रशासनाचे लक्ष वेधले होते. त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांना पत्र दिले होते.

दरम्यान, शाळेची वेळ पुर्ववत करण्याचा निर्णय घेण्यात येऊन जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांच्या मुख्याध्यापकांना तसे आदेश देण्यात आले असल्याचे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

## पान १ वरुन

### कृषिपदवी अभ्यासक्रम प्रवेश...

परिषदेच्या बैठकीत हा धोरणात्मक निर्णय घेतल्याची माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली आहे.

कृषी विद्यापीठातील बी.एस्सी. (ऑनर्स) कृषी, उद्यानविद्या, बीएफएससी, वनशास्त्र, बी.टेक. कृषी अभियांत्रिकी, अन्नशास्त्र, जैवतंत्रज्ञान, कृषी व्यवसाय व्यवस्थापन आणि सामुदायिक विज्ञान अशा एकूण नऊ पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी आतापर्यंत खुल्या वर्गातील उमेदवारांसाठी इयत्ता बारावी विज्ञानमध्ये ५०% गुणांची अट होती. महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेची ११८वी बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत सदर अट शिथिल करत खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ४५% आणि आरक्षित प्रवर्गासाठी ४०% गुणांची अट लागू करण्यात आली आहे. तसेच प्रवेश अर्जासाठी अंतिम मुदत २७ जुलै २०२५ पर्यंत असून इच्छुक विद्यार्थ्यांनी https://cetcell.mahacet.org या संकेतस्थळावर प्रवेशासाठी अर्ज सादर करावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**बारावीचे टक्के कृषीमुळे वाढणार**

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या बारावी विज्ञान अभ्यासक्रमात कृषी (८०८) हा विषय शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना यापूर्वी पदवी प्रवेशात अधिभार मिळत नव्हता. आता महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेच्या ११५ व्या बैठकीत झालेल्या ठरावानुसार या विषयाला १० गुण अधिभार देण्यास सरकारने मान्यता दिली आहे. यामुळे अशा विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठीच्या गुणवत्तेत वाढ होणार आहे. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रात आणण्यासाठी सकारात्मक पाऊल असून प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास कोकाटे यांनी व्यक्त केला आहे.

### बाजार समित्यांच्या सचिवांचे...

राज्यातील अनेक बाजार समित्यांमध्ये पात्रता नसलेले, अल्पशिक्षित व अननुभवी व्यक्तींची सचिव पदावर नियुक्ती केली आहे. अशा अपात्र सचिवांना पदाधिकारी व संचालक नियुक्ती देतात. या सचिवांना हाताशी धरुन कारभार होत असल्याने बाजार सामित्यांमध्ये सत्तेची मक्तेदारी, मनमानी आणि पदाधिकारी व सचिवांच्या साटेलोट्यातून गैरव्यवहार होत असल्याचे दिसून येते. याला प्रतिबंध करण्यासाठी उच्चशिक्षित व अनुभवी व्यक्तींचे सचिव पदासाठी पॅनेल केले जाणार आहे. या पॅनेलमधूनच सचिव नियुक्त केले जातील. तसेच वर्षानुवर्षे एकाच बाजार समितीत कार्यरत असणाऱ्या सचिवांच्या बदलाचेही संकेत दिले गेले आहेत. बाजार समित्यांच्या कारभारात पारदर्शकपणा आणण्याच्यादृष्टीने शासनाने सदरचे पाऊल उचलण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय महत्वाचा मानला जात आहे.

### ११ बँक खात्यांमध्ये तब्बल...

करून ९ दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली होती. त्या कालावधीत त्याच्याकडून सखोल चौकशी केली असता वरील सर्व व्यवहार उघडकीस आले. २५ जुलै रोजी पोलीस कोठडीची मुदत संपल्यानंतर त्याला राहाता येथील एम.पी.आय.डी. विशेष न्यायालयासमोर हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला २९ जुलैपर्यंत आणखी ४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. पोलिसांनी सावळे याच्या मालमत्तेची चौकशी करत असताना शिर्डीतील आलिशान घर, महागड्या गाड्या, सोने, तसेच प्लॉट खरेदी केल्याचे पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाले आहे. या मालमत्तांची माहिती गोळा करून पोलिसांकडून जप्तीची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. ग्रो मोअर घोटाळ्यात सावळे एकटा नव्हे, तर इतर चौघे संशयित आरोपी आहेत. या संशयित आरोपींचा शोध सुरू आहे.

**१३ अनधिकृत खात्यांत ९.६४ कोटींचे संशयित व्यवहार**

तपासात आणखी एक गंभीर बाब उघडकीस आली आहे. ग्रो मोअर कंपनीच्या बाहेरील १३ व्यक्ती/कंपनी/फर्म यांच्या नावे एकूण ९ कोटी ६४ लाख २८ हजार ६९४ रूपयांचे संशयास्पद व्यवहार झाले आहेत. या रकमा नेमक्या कोणत्या हेतूने आणि कोणाच्या खात्यात वळवण्यात आल्या, याचा शोध आर्थिक गुन्हे शाखा घेत आहे.

### पाणलोटात श्रावणसरींचा जोर वाढला

भरभरून वाहत धरणात विसावत आहेत. परिणामी धरणाची पातळी वाढू लागली आहे. ११०३९ दलघफू क्षमतेच्या भंडारदरा धरणात काल सायंकाळी ८८९१ दलघफू (८०.५४ टक्के) पाणीसाठा झाला होता. पाऊस सुरूच असल्याने नियमानुसार जुलै अखेर ८५ टक्के पाणीसाठा झाल्यावर पाण्याचा विसर्ग वाढविण्याची शक्यता आहे. दिवसभर पाऊस असल्याने कालच्या आठवडा बाजारात शुकशुकाट जावणत होता. पाऊस सुरू झाल्याने काही भागात भात आवणीच्या कामाने वेग घेतला आहे. तर गत आठवड्यात जोरदार पाऊस कोसळल्याने भात रोपांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने हे शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. निळवंडेतही पाण्याची आवक होऊ लागली आहे. काल सायंकाळी ७२६९ दलघफू पाणीसाठा होता. या धरणातून १५७० क्युसेसने विसर्ग सुरू आहे. आढळा पाणलोटातही पाऊस सुरू असल्याने या धरणात ९ दलघफू पाण्याची आवक झाली.

कोतूळ वार्ताहराने कळविले की, मुळा पाणलोटातील हरिश्चंद्र गड, आंबित, पाचनई व अन्य भागात श्रावणसरी जोरदार बरसू लागल्याने मुळा नदीतील पाणी तासागणिक वाढु लागले आहे. काल सायंकाळी कोतूळ येथील मुळा नदीचा विसर्ग १५१० क्युसेक होता. रात्री पाऊस वाढल्याने काल शुक्रवारी सकाळी तो ३२१२ क्युसेक झाला होता. दिवसभर पावसाचा जोर आणखी वाढल्याने सायंकाळी नदीतील कोतूळ येथील विसर्ग ८३७३ क्युसेस होता. त्यामुळे धरणतील पाणीसाठा १९५६० दलघफू झाला होता. रात्री उशीरापर्यंत पावसाचा जोर टिकून होता. पावसाचा जोर वाढल्यास या धरणांमधून विसर्ग वाढविण्यात येण्याची शक्यता आहे.

# श्रावणात त्र्यंबकेश्वर मंदिर अधिक काळ खुले राहणार

**नाशिक (प्रतिनिधी)–**श्रावण महिन्यात त्र्यंबकेश्वरमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक दर्शनासाठी येतात. मंदिरात गर्दी झाल्यानंतर दर्शनासाठी अधिक वेळ लागतो. हे लक्षात घेऊन मंदिर प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय गेतला आहे. श्रावणात त्र्यंबकेश्वर मंदिर दररोज पहाटे ५ वाजल्यापासून ते रात्री ९ वाजेपर्यंत भाविकांना दर्शनासाठी खुले राहणार आहे. यामुळे भाविकांना दर्शनासाठी पुरेसा वेळ मिळेल.

श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारी त्र्यंबकेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी नेहमीच जास्त असते. ही बाब लक्षात घेऊन, प्रत्येक श्रावण सोमवारी मंदिर पहाटे ४ वाजल्यापासून ते रात्री ९ वाजेपर्यंत दर्शनासाठी उघडं राहणार आहे.

## देव तारी त्याला कोण मारी?

# विजेचा धक्का बसूनही वायरमन बचावले

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** म्हणतात ना, देव तारी त्याला कोण मारी? याची प्रचिती महावितरणचे लाईनमन वायरम अनिल दौंड यांना आली. त्यांना वीज डीपीवर काम करताना विजेचा तीव्र झटका बसला, तरी ते बचावले आहे.



दौंड हे बेलापूर, ऐनतपूर, वळदगाव, उंबरगाव भागात महावितरण वीज कंपनीचे काम पहातात. उंबरगावच्या एका वीज डीपीवर जंक कट झाला होता. ते वीज प्रवाह खंडीत करून खांबावर चढले. जंक जोडताना आणि अंतिम जोड पहात असताना त्यांना अचानक वीजेचा झटका बसला. ते खांबावरून कोसळातांना त्यांचा पाया डीपीच्या अँगलमध्ये अडकल्याने ते तिथेच लटकले. खाली उभे असलेले शेतकरी घाबरले, कोणीही वर जाण्याची हिंमत करत नव्हते. तातडीने त्यांच्या मुलाला आणि महावितरण वीज कंपनीचे अधिकारी चव्हाण व वाणी यांना संपर्क करण्यात आला. लोक जमा होईपर्यंत वायरम अनिल दौंड बेशुद्ध झाले होते. त्यानंतर त्यांना तातडीने खाली काढून रुग्णालयात नेण्यात आले. आणि त्यांच्यावर उपचार करण्यात आले. रात्री ११.३० च्या सुमारास ते शुध्दीवर आले, त्यावेळी डॉक्टरांनीही सांगितले की, देव तारी त्याला कोण मारी? हेच खरे आहे. काही दिवस ते रुग्णालयात उपचार घेऊन कामावर हजर झाले असून आज पवित्र श्रावण महिन्याच्या पहिल्या दिवशी त्यांनी शिवशंकर मळ्यात श्री महाकाल कोळेश्वर महादेवाचे दर्शन घेतले. त्यावेळी दौंड म्हणाले, मला महादेवानेच वाचवले, चांगल्या कामाची पुण्याई आहे. ज्येष्ठ पत्रकार मनोज आगे यांच्यासमवेत सचिन शेटे आणि संकेत उंडे यांनी दौंड यांचा जीव वाचल्याबद्दल टोपी, शाल, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार केला.

# श्रीरामपुरात चाकूने तरुणावर वार

**श्रीरामपूर (प्रतिनिधी)–** हॉटेलमध्ये पार्सल घेऊन जेवायला गेलेल्या दोघांना खुनशीने पाहतो असे म्हणत एकाने चाकूचा वार करून जखमी केल्याची घडला घडली.

याबाबत अभय दिलीप भाट, (वय ३५), रा. बोरावकेनगर, म्हाडा कॉलनी, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, २३ जुलैला आपण आणि आपला मित्र सागर मलिक अहिल्यानगरला कामानिमित्त गेलो होतो. परत येताना बेलापूरला हॉटेल सह्याद्री येथून जेवणाचे पार्सल घेऊन रात्री १ वाजता आम्ही जेवण करण्यासाठी सूतगिरणी फाट्यावरील कालिका हॉटेल येथे गेलो. तेव्हा तेथे माझ्या ओळखीचे निलेश लांबोळे, रा. गोंधवणी पुलाजवळ, व राहुल चिंतामणी, अश्पाक जहागिरदार, (दोघे रा. वॉर्ड नं. २), श्रीरामपूर हे होते. तुम्ही आमच्याकडे खुनशीने का पाहता? असे म्हणून त्यांनी शिवीगाळ सुरू केली. तेव्हा त्यांना समजून सांगत असताना लांबोळे याने त्याच्याजवळील चारचाकी गाडीतून चाकू काढून आपल्या तोंडावर मारला. त्यानंतर चिंतामणी याने कोयता काढून दम दिला आणि अश्पाक व त्याच्यासोबत असणाऱ्या दोघांनी विटाचे तुकडे हातात धरून मारहाण करत आमच्या नादी लागला तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सदर फिर्यादीवरून निलेश लांबोळे, राहुल चिंतामणी, अश्पाक जहागिरदार आणि अनोळखी दोन इसम यांच्याविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर छताचा भाग कोसळला

**मुंबई (प्रतिनिधी)–** मुंबईत सुरु असलेल्या जोरदार पावसामुळे मंत्रालयाच्या सातव्या मजल्यावर असलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाबाहेरील छताचा छोटा भाग शुक्रवारी दुपारी अचानक कोसळला. सुदैवाने यात कोणीही जखमी झाले नाही. सीलिंगला गंज लागल्यामुळे हा भाग कोसळला. सातव्या मजल्यावर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष असल्याने राज्यभरातून मदतीसाठी येणारे रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांची मोठी गर्दी असते. छताचा भाग कोसळला तेव्हा त्या ठिकाणी कुणीही नसल्याने मोठी दुर्घटना टळली. या घटनेची प्रशासनाकडून तात्काळ दखल घेण्यात आली.